Frequently Asked Questions

| | |
|---|---|
| १ | वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यास मिळालेले ई चलन कसे भरावे ?<br><br>वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यास मिळालेले ई चलन खालील प्रमाणे भरता येईल.<br>१) मुंबई वाहतूक पोलीसांचे संकेतस्थळ https://trafficpolicemumbai.maharashtra.gov.in<br>२) मुंबई वाहतूक पोलीसांचे मोबाईल ॲप्लीकेशन mumbaitrafficpoliceapp<br>३) वाहतूक पोलीस यांचेकडे असणाऱ्या ई चलन मशीनव्दारे<br>४) कोणत्याही वाहतूक विभागास प्रत्यक्ष भेट देवून |
| २ | वाहतूक कोंडी झाल्यास त्याबाबत तक्रार कोठे करावी अथवा वाहतूक कोंडीबाबत अपडेट कोठे मिळतील ?<br><br>मुंबई शहरात वाहतूक कोंडी झाल्यास मुंबई वाहतूक पोलीस नियंत्रण कक्षाचा दुरध्वनी क्रमांक ०२२२४९३७७५५ वर तक्रार करावी तसेच वाहतूक संदर्भात ताजे अपडेटसाठी मुंबई वाहतूक पोलीसांचे ट्विटर हॅन्डल @MTPHeareToHelp यास Follow करावे. |
| ३ | मुंबई वाहतूक पोलीसांच्या संकेतस्थळावर कोणती माहिती उपलब्ध आहे ?<br><br>मुंबई वाहतूक पोलीसांच्या संकेतस्थळावर वाहतूक संदर्भातील कायदे, वाहतूक विभागातील अधिकारी यांचे दुरध्वनी क्रमांक, ई मेल आयडी, पत्ते हि माहिती मिळेल तसेच वाहतूक NOC संबधीत माहिती, वाहतूक अधिसूचना, ई चलन भरण्याची सुविधा, ई चलन तक्रार करण्याची सुविधा, नागरीकांना वाहतूक विषयक फिडबॅक देण्याची सुविधा, आर.टी. आय संदर्भात माहिती व वाहतूक विषयी इतर महत्वाची माहिती उपलब्ध आहे. |
| ४ | वाहतुक पोलीसांना काही सुचना अथवा फिडबॅक कसा दयावा ?<br><br>मुंबई वाहतूक पोलीसांचे संकेतस्थळ https://trafficpolicemumbai.maharashtra.gov.in वर मुंबई वाहतुक पोलीसांना काही सुचना अथवा फिडबॅक देण्याची सुविधा उपलब्ध आहे. |
| ५ | वाहतूक स्वयंसेवक (ट्रफिक वॉर्डन)म्हणून काम करण्यासाठी काय करावे ?<br><br>वाहतूक स्वयंसेवक (ट्रफिक वॉर्डन)म्हणून काम करण्यासाठी इच्छुक असल्यास तुम्ही मुंबई वाहतूक पोलीसांच्या कार्यालयात संपर्क साधू शकतात त्यांच्याकडे स्वयंसेवकासाठी असलेल्या योजना आणि अवश्यकतेनुसार तुम्ही अर्ज करू शकतात |
| ६ | ई चलन म्हणजे काय आणि ते कसे काम करते ?<br><br>ई चलन हे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनांस डिजीटल स्वरूपात दिले जाणारे दंड पत्रक आहे. वाहतूक पोलीसांना वाटप करण्यात आलेल्या ई चलन उपकरण तसेच विविध इलेक्ट्रॉनिक माध्यमाव्दारे वाहतूकीचे नियमांचे उल्लंघन करणारे वाहनांवर ई चलन जारी केले जाते व हे ई चलन आपल्या वाहनाशी नोदणीकृत असलेल्या मोबाईल क्रमांकावर एस.एम.एस व्दारे पाठविले जाते. |
| ७ | आपल्यास ई चलन मिळाल्याचे कसे कळेल ?<br><br>आपल्यास जारी केलेले ई चलन आपल्या वाहनाशी नोदणीकृत असलेल्या मोबाईल क्रमांकावर एस.एम.एस व्दारे पाठविले जाते. तसेच आपणाकडे असलेल्या मुंबई वाहतूक पोलीसांचे मोबाईल ॲप्लीकेशन mumbaitrafficpoliceapp नोटीफिकेशन पाठविले जाते या व्यतिरीक्त आपण मुंबई वाहतूक पोलीसांचे संकेतस्थळ https://trafficpolicemumbai.maharashtra.gov.in वर तुमच्या वाहन क्रमांक व चलान क्रमांची नोंद करूनही ई चलान तपासू शकता. |

| | |
|---|---|
| ८ | ई चलनाची तक्रार कोठे करावी ?<br><br>ई चलनाची ऑनलाईन तक्रार (Grievance) करण्याची सुविधा मुंबई वाहतूक पोलीसांचे संकेतस्थळ https://trafficpolicemumbai.maharashtra.gov.in वर व मुंबई वाहतूक पोलीसांचे मोबाईल ॲप्लीकेशन mumbaitrafficpoliceapp वर करण्याची सुविधा उपलब्ध आहे. तसेच तुम्ही ई चलनाबाबत तक्रारीचा लेखी अर्ज संबधीत वाहतूक विभागास देउ शकतात अथवा ई मेल व्दारे पाठवू शकतात. |
| ९ | ई चलनाचा मेसेज येत नसेल तर काय करावे ?<br><br>ई चलनाचा एस.एम.एस येत नसेल तर संबधीत प्रादेशिक परिवाहन कार्यालयात जावून आपला मोबाईल क्रमांक आपले वाहनाकरीता नोदंणिकृत करुन घ्यावा तसेच वन स्टेट वन चलन सिस्टम मध्ये आपला वाहन क्रमांक मोबाईल क्रमांकाशी नोंदणिकृत करण्याची सुविधा मुंबई वाहतूक पोलीसांचे संकेतस्थळ https://trafficpolicemumbai.maharashtra.gov.in वर व मुंबई वाहतूक पोलीसांचे मोबाईल ॲप्लीकेशन mumbaitrafficpoliceapp वर उपलब्ध आहे. |
| १० | ई चलन भरणा केल्याची पावती कशी मिळवावी ?<br><br>मुंबई वाहतूक पोलीसांचे संकेतस्थळ https://trafficpolicemumbai.maharashtra.gov.in वर व मुंबई वाहतूक पोलीसांचे मोबाईल ॲप्लीकेशन mumbaitrafficpoliceapp वर ई चलन भरणा केल्याची ऑनलाईन PDF स्वरुपात पावती मिळवीण्याची सुविधा उपलब्ध आहे. |
| ११ | ई चलना संदर्भात समस्या असल्यास कोणाशी संपर्क करावा ?<br><br>ई चलन संदर्भात समस्या असल्यास मुंबई वाहतूक पोलीसांचा हेल्पलाईन क्रमांक ८४५८९९९९९ वर संपर्क करावा |
| १२ | वाहन रस्त्यात बंद पडल्यास किंवा पंचर झाल्यास वाहतूक पोलीसाकडून मदत मिळवू शकते का ?<br><br>मुंबई वाहतूक पोलीस थेट या सेवा पुरवत नाहीत, परंतु तुम्ही मुंबई वाहतूक पोलीसांच्या हेल्पलाईन क्रमांक ८४५४९९९९९ वर संपर्क साधून परिस्थीती कळवू शकता ते तुम्हाला जवळच्या मदत सेवेशी संपर्क साधण्यास किंवा योग्य मार्गदर्शन करण्यास मदत करु शकतात. |
| १३ | वाहतूक सिग्नल बंद असल्यास अथवा बिघाड झाल्यास कोणास कळवावे ?<br><br>वाहतूक सिग्नल बंद असल्यास किंवा त्यात बिघाड झाल्यास तुम्ही तत्काळ मुंबई वाहतूक पोलीसांचे हेल्पलाईन क्रमांक ८४५४९९९९९ वर किंवा मुंबई वाहतूक पोलीस नियंत्रण कक्षाचा दुरध्वनी क्रमांक ०२२२४९३७७५५ यावर कळवावे यामुळे लवकरात लवकर दुरुस्तीची व्यवस्था करू शकतील आणि वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी उपाययोजना करतील |
| १४ | वाहतूक विभाग संबधी प्रथम अपिलीय अधिकारीची माहिती काय आहे ?<br><br>वाहतूक विभाग संबधी प्रथम अपिलीय अधिकरी खालील प्रमाणे आहेत.<br>मा. पोलीस उप आयुक्त मुख्यालय,<br>वाहतूक पोलीस मुख्यालय, ८७, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई.<br>दूरध्वनी क्र : ०२२-२४९४६२२३ |

| | |
|---|---|
| १५ | वाहतूक संदर्भात वेळोवेळी होणारे अधिसुचनाची माहिती कोठे पाहावी ?<br><br>वाहतूक संदर्भात वेळोवेळी होणाऱ्या वाहतूक अधिसुचना मुंबई वाहतूक पोलीसांच्या https://trafficpolicemumbai.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर Notifications मध्ये PDF स्वरूपात ऑनलाईन उपलब्ध आहे. |
| १६ | वाहतूक विषयक कायदे कोठे पाहता येतील ?<br><br>वाहतूक विषयक कायदयांच्या प्रती मुंबई वाहतूक पोलीसांच्या https://trafficpolicemumbai.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर Documents मध्ये PDF स्वरूपात ऑनलाईन उपलब्ध आहे. |
| १७ | वाहतूक पोलीसांना बॉडीवॉर्न कॅमेरा कशासाठी देण्यात आला आहे ?<br><br>मुंबई शहरात वाहतूक पोलीसांना देण्यात आलेल्या बॉडीवॉर्न कॅमेराचा उपयोग कर्तव्यातील पारदर्शकता, पोलीस व नागरिक यांच्यातील घटनेचे वस्तुनिष्ठ रेकॉर्डिंग व पुरावा जमा करण्यासाठी होतो. |
| १८ | मुंबई वाहतूक पोलीसांचा हेल्पलाईन नंबर काय आहे ?<br><br>मुंबई वाहतूक पोलीसांचा हेल्पलाईन नंबर ८४५४९९९९९९ आहे. |
| १९ | मुंबई वाहतूक पोलीसांचे ट्विटर हॅन्डल काय आहे ?<br><br>मुंबई वाहतूक पोलीसांचे ट्विटर हॅन्डल @MTPHereToHelp आहे. |